# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे

जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१
फोन नं.(०२०) २६०५०६४१ ई-मेल :- sceapune@gmail.com

जा.क्र.रासनिप्रा/आचारसंहिता/ १६७४ /सन २०२०.
दि. १५/०६/२०२०.

वाचावे :-

१. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम ७३ कब
२. महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणुक) नियम, २०१४ चे नियम ३ (III)
३. महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणुक) (प्रथम सुधारणा) नियम, २०१८ दि.६.०८.२०१८

## परिपत्रक

### विषय :- सहकारी संस्थांच्या निवडणुकांसाठी आचारसंहिते बाबत.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७३ (क) (ब) मधील तरतुदीनुसार राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण यांची जबाबदारी राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणावर सोपविलेली आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ चा नियम ३ (III) मध्ये राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण सहकारी संस्थांची वर्गवारी व व्यवसाय स्वरुप यास अनुसरुन सहकारी संस्थांचे कार्यक्षेत्रात आचारसंहिता विषद करुन जारी करेल अशी तरतुद आहे.

राज्यातील सर्व सहकारी संस्थांच्या निवडणुका नि:पक्षपातीपणे, स्वच्छ, पारदर्शक, मोकळया व भयमुक्त वातावरणात व योग्य रीतीने व्हाव्यात यासाठी आदर्श आचारसंहिता विशद करुन लागु करणे आवश्यक आहे. यासाठी राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चा नियम ३ (III) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार पुढीलप्रमाणे आदर्श आचारसंहिता विषद करुन लागु करीत आहे. तसेच सदर विषयाशी संबंधित प्राधिकरणाने यापुर्वी निर्गमित केलेली परिपत्रके जा.क्र.५६२/१४ दि.२०.१०.२०१४, जा.क्र.६१२/१५ दि.१९.०१.१५, जा.क्र.६३१/१५ दि.२०.०१.१५, जा.क्र.२८९८/१५ दि.२.०३.२०१५, जा.क्र.३२९०/१५ दि.१९.०३.२०१५, जा.क्र.५४८०/१५ दि.२२.०६.२०१५ ही अधिक्रमित करुन खालीलप्रमाणे सुधारीत परिपत्रक निर्गमित करण्यात येत आहे.

१) **अंमलात येण्याचा दिनांक** :- हे आदेश सर्व सहकारी संस्थांच्या निवडणुकांसाठी तात्काळ प्रभावाने लागु होतील.

२) **आचारसंहितेची व्याप्ती** :- निवडणुकीची आचारसंहिता ज्या सहकारी संस्थेची निवडणुक घोषीत झाली आहे, अशा सहकारी संस्थेच्या कार्यक्षेत्रात तिच्याशी निगडीत बाबींसाठी लागु असेल.

३) **आचारसंहितेचा कालावधी** :- सहकारी संस्थांच्या निवडणुकीची आचारसंहिता संबंधीत सहकारी संस्थेच्या निवडणूकीकरीता नामनिर्देशन सुरु होण्याच्या तारखेपासुन लागु होईल व ती मतदान संपेपर्यंत राहील.

४) **जाहीर प्रचार बंदीचा कालावधी** :- सहकारी संस्थांमध्ये जाहीर प्रचारबंदीचा कालावधी निवडणुकांसाठी संस्थेच्या प्रकारानुसार पुढीलप्रमाणे राहील.

| अ. क्र. | सहकारी संस्था प्रकार | जाहीर प्रचार बंदीचा कालावधी |
|---|---|---|
| १ | 'अ' वर्ग सहकारी संस्था | मतदानास सुरुवात होण्यापुर्वी २४ तास आगोदर प्रचार बंद होईल. |
| २ | 'ब' वर्ग सहकारी संस्था | |
| ३ | 'क' वर्ग सहकारी संस्था | |
| ४ | 'ड' वर्ग सहकारी संस्था | |

५) **आचारसंहितेचे पालन** :- सहकारी संस्थांच्या निवडणुकांमध्ये आचारसंहितेचे पालन सर्व संबंधीतांनी करणे अत्यंत आवश्यक आहे. आचारसंहितेचे पालन याचा अर्थ प्रामुख्याने निवडणुक जाहीर झालेल्या संस्थेतील मतदारांवर प्रभाव पाडणारे निर्णय निवडणुकीच्या तोंडावर विद्यमान संचालक मंडळाने घेवू नयेत अथवा, अशी कोणतीच कृती करु नये असा होतो. जर याचे उल्लघंन झाल्यास आचारसंहिता कक्षाने जिल्हा/तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांना तात्काळ अहवाल सादर करावा.

पण याच बरोबर हे सुध्दा आवश्यक आहे की, सहकारी संस्थेच्या पूर्वीच्याच योजना, उपविधी किंवा इतर नियमात नमुद कामे किंवा दैनंदिन कामकाजात खंड पडता कामा नये. आचारसंहिता असल्याने संस्थेच्या उद्दिष्टात नमुद कामे व यापूर्वी ज्या कामाबाबत निकष / योजना निश्चित केली आहे, त्याबाबत कार्यवाही करु नये असा आचारसंहितेचा अर्थ होत नाही. जी कामे निवडणुका जाहीर होण्याआधीपासून प्रत्यक्षरित्या सुरु असतील ती तशीच सुरु ठेवता येतील. मात्र त्याचा उपयोग मतदारांवर प्रभाव पाडणेकरीता करु नये.

संस्थेच्या दैनंदिन कामकाजाव्यतिरिक्त इतर तत्कालिन परिस्थितीत आवश्यक असलेले कामकाज उदा :- अत्यावश्यक निविदा काढणे, जाहिराती देणे आदी बाबींसाठी राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाची परवानगी आवश्यक असेल. सदरची परवानगी घेतली आहे किंवा कसे याबाबतची खातरजमा करण्याची जबाबदारी जिल्हा/तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांचे कार्यालयातील आचारसंहीता कक्षाची राहील.

६) **सहकारी संस्थांचे सेवक** :- ज्या सहकारी संस्थेची निवडणुक घोषित झाली आहे. त्या सहकारी संस्थेचे सेवक आपले दैनंदिन कामकाज सुरु ठेवतील तथापि संस्थेचा कोणताही सेवक, त्या सहकारी संस्थेच्या निवडणुकीत प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या सहभाग घेणार नाही. सहकारी संस्थेच्या सेवकाने निवडणुकीमध्ये व प्रचारामध्ये कोणत्याही उमेदवारासाठी अथवा पॅनेलसाठी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरित्या सहभागी होवू नये. संबंधिताकडुन याचे अनुपालन होत आहे काय यावर जिल्हा/तालुका सहकारी निवडणूक अधिकारी कार्यालयातील आचारसंहीता कक्षाने देखरेख ठेवावी. आणि त्याचा अहवाल जिल्हा/तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांना

सादर करावा. सहकारी संस्थेचा सेवक हा त्या सहकारी संस्थेचा सभासद असला तरी त्यास प्रचारामध्ये कोणत्याही उमेदवारासाठी अथवा पॅनेलसाठी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरित्या सहभागी होता येणार नाही.

नामनिर्देशन पत्रे स्विकारण्यास सुरुवात झालेनंतर संस्थेचे सर्व सेवक हे निवडणुक निर्णय अधिका-याच्या अधिपत्याखाली येतील. निवडणुकीची घोषणा झालेपासून आचारसंहितेचा कालावधी संपेपर्यंत संस्थेचे सर्व सेवक संचालक मंडळास जबाबदार असणार नाहीत. तथापि ते त्यांचेवर सोपविलेली दैनंदिन तसेच पोटनियम अथवा सेवानियमात नमुद कामे करण्याचे चालु ठेवतील.

निवडणुकीची आचारसंहिता लागु झालेनंतर सहकारी संस्थेच्या सेवकांच्या बदल्या करता येणार नाही. तथापि निवडणुक निर्णय अधिकारी निवडणुक कामकाजाच्या सोईसाठी व निवडणुक कालावधीपूरते त्यांना आवश्यक वाटतील तर सर्व अथवा काही सेवकांवर त्यांचे दैनंदिन कामकाजाव्यतिरिक्त इतर कामकाज सोपवु शकतील अथवा एका विभागातुन दुस-या विभागात किंवा एका ठिकाणाहून दुस-या ठिकाणी निवडणुकीचे कामकाजासाठी त्यांची सेवावर्ग करु शकतील.

७) **उद्घाटन व समारंभ :-** निवडणुका जाहीर झालेनंतर सहकारी संस्थाच्या कार्यक्षेत्रामध्ये संस्थेच्या खर्चाने पुर्ण झालेल्या कामांचे उद्घाटन समारंभ इत्यादी आयोजित करता येणार नाहीत. तथापी, सहकारी संस्थेच्या किंवा राज्य शासनाच्या किंवा केंद्र शासनाच्या किंवा केंद्र शासन अथवा राज्य शासन यांच्या अधिपत्याखालील महामंडळांच्या योजनेतून पुर्ण झालेल्या कामांचा उपयोग सभासदासांठी तात्काळ व्हावा या दृष्टीने समांरभ आयोजित न करता देखील पुर्ण झालेली कामे / योजना सभासदांच्या उपयोगासाठी खुली / सुरु करता येतील. मात्र अशावेळेस संबंधितांकडुन निवडणूक आचारसंहितेच पालन होत असल्याची खातरजमा आचारसंहीता कक्षाने करावी. सदर प्रकरणी उल्लघंन झाल्यास आचारसंहिता कक्षाने त्याचा अहवाल तात्काळ संबंधित जिल्हा/तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांना सादर करावा.

८) **उमेदवारांनी खर्चाचा हिशोब सादर करणेबाबत :-** नामनिर्देशनपत्र भरल्यापासून ते मतमोजणी पर्यंतच्या कालावधीत प्रत्येक उमेदवाराने निवडणुकीवर किती खर्च करावा यासाठी प्राधिकरणाने मर्यादा घालुन दिलेली आहे. निवडणुकीचे निकाल जाहिर झाल्याच्या दिनांकापासून ६० दिवसाचे कालावधीचे आत निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे निवडणूक खर्चाचा हिशोब सादर करावा. या संदर्भात नियमांचे पालन न करणा-या उमेदवारांवर भारतीय दंड सहितेंनुसार कार्यवाही करण्यात येईल. तसेच जे उमेदवार राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाने विहीत केलेल्या कालावधीत खर्चाचा हिशोब सादर करणार नाहीत अथवा राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाने वेळोवेळी विहीत केलेल्या मर्यादेत खर्च करणार नाहीत, असे उमेदवार निवडणुक नियम ६६ मधील तरतुदीनुसार अनर्हतेस पात्र आहेत. त्यामुळे या संदर्भातील सुचनांचे पालन काटेकोरपणे होणे आवश्यक आहे.

राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाच्या आदेशानुसार उमेदवारांच्या एका गटाने (पॅनेलने) निवडणुकी करीता केलेला खर्च त्या गटातील (पॅनेलने) उमेदवारांमध्ये विभागून दाखवायचा आहे.

९) **पदाधिकारी व अधिकारी यांचे दौरे वाहन व विश्रामगृहाच्या वापराबाबत :-** संस्थेच्या संचालक मंडळाने आचारसंहिता कालावधीत, आचारसंहिता लागु असलेल्या कार्यक्षेत्रात किंवा कार्यक्षेत्राच्या बाहेरही संस्थेच्या खर्चाने दौरे करु नयेत.

संस्थेच्या वाहनाचा व विश्रामगृहाचा वापर संचालकास, उमेदवारास अथवा इतर कोणासही आचारसंहिता कालावधीत करता येणार नाही. यामध्ये सहकारी संस्थेकडून वापरण्यात येणाऱ्या अग्निशमन वाहने, रुग्णवाहिका, कॅशव्हॅन, जे.सी.बी. , रोडरोलर, हार्वेस्टर व पाण्याचे टँकर इ. यांचा समावेश असणार नाही.

सहकारी संस्थांची वाहने व कर्मचारी वर्ग यांचा निवडणुकीच्या कामकाजासाठी विद्यमान पदाधिकारी / संचालकांनी अथवा सदस्यांनी कोणत्याही परिस्थीतीत वापर करु नये.

आचारसंहितेच्या कालावधीत राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाचे अधिकारी / कर्मचारी यांना निवडणुकीच्या कामासाठी व निवडणुक निर्णय अधिकारी यांच्या पूर्व परवानगीने संस्थेचे अधिकारी व कर्मचारी यांना संस्थेच्या कामकाजासाठी संस्थेच्या विश्रामगृहाचा व वाहनाचा वापर करता येईल. मात्र याबाबत परवानगी घेतली असल्याची खातरजमा आचारसंहीता कक्षाने करुन त्याचा अहवाल संबंधित जिल्हा/तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांना सादर करावा.

१०) **वाहनांच्या वापराबाबत** :- संस्थेच्या निवडणुकीच्या कालावधीत संस्थेची सर्व वाहने निवडणुक निर्णय अधिका-याच्या अधिपत्याखाली राहतील व निवडणुक निर्णय अधिकारी अथवा निवडणुकीशी संबंधीत कर्मचारी संस्थेच्या वाहनांचा वापर निवडणुकीच्या कामकाजासाठी व संस्थेच्या दैनंदिन कामकाजासाठी करु शकतील. कोणत्याही परिस्थितीमध्ये निवडणुकीच्या काळात प्रचार मोहिम, निवडणुक कार्य किंवा निवडणुकीशी संबंधीत प्रचार करण्यासाठी संस्थेच्या वाहनांचा वापर होणार नाही यावरील देखरेख आचारसंहीता कक्षाने घ्यावयाची आहे. याबाबत उल्लघंन झाल्यास त्याचा अहवाल संबंधित जिल्हा/तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांना सादर करावा.

संस्थेच्या निवडणुकीच्या प्रचाराकरीता खाजगी वाहनांचा वापर करता येईल मात्र त्याचा खर्च उमेदवाराने करावयाच्या खर्चामध्ये समाविष्ट करण्यात यावा. अशा खर्चाचा समावेश उमेदवाराने केला आहे किंवा कसे याची खातरजमा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी करावी.

११) **शस्त्रास्त्र बंदी** :- निवडणुका जाहीर झाल्यापासून निवडणुकीशी संबंधीत व्यक्तीस शस्त्रास्त्रे बाळगता येणार नाही. ही बंदी निवडणुक प्रक्रीया पुर्ण होई पर्यंत अंमलात राहील. शस्त्राचा दुरुपयोग होणार आहे अशा ठिकाणी जिल्हा दंडाधिकारी / पोलिस आयुक्त / जिल्हा पोलिस अधिक्षक यांनी प्रतिबंधात्मक आदेश काढणे बाबत जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांनी प्रस्ताव सादर करावा. याची दक्षता संबंधित जिल्हा/तालुका सहकारी निवडणूक अधिकारी कार्यालयातील आचारसंहीता कक्षाने करावयाची असुन याचे उल्लघंन झाल्यास त्याचा अहवाल संबंधित जिल्हा/तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांना सादर करावा.

१२) **ध्वजारोहण व शासकीय सण** :- आचारसंहितेच्या कालावधीत प्रजासत्ताक दिन अथवा स्वातंत्र्य दिन असे दिवस आल्यास संस्थेच्या पदाधिका-यांनी प्रजासत्ताक दिनी अथवा स्वातंत्र्य दिनी ध्वजारोहण करण्यास हरकत नाही. तथापि, अशा कार्यक्रमांच्या नेहमींच्या स्थळांमध्ये बदल करण्यात येवू नये. तसेच या समारंभात करावयाची भाषणे स्वातंत्र्य मिळविण्यासाठी बलिदान केलेल्या हुतात्म्यांचा तसेच देशाचा गौरव यापुर्तीच मर्यादित ठेवण्यात यावीत. कोणत्याही परिस्थितीत या समारभांत निवडणुक प्रचाराविषयी भाषणे करता येणार नाहीत. या सूचना

महाराष्ट्र दिन, सदभावना दिन, मराठवाडा मुक्ती संग्राम दिन अशा दिवसाठीही लागु राहतील. याचे पालन होत आहे किंवा कसे याची देखरेख संबंधित जिल्हा/तालुका सहकारी निवडणूक अधिकारी कार्यालयातील आचारसंहीता कक्षाने करावयाची असुन याचे उल्लघंन झाल्यास त्याचा अहवाल संबंधित जिल्हा/तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांना सादर करावा.

१३) **इलेक्ट्रॉनिक मिडीयाव्दारे प्रचार करणेबाबत** :- इलेक्ट्रॉनिक मिडीयाव्दारे कोणतेही साहित्य प्रसारित करण्यापूर्वी या संदर्भात संबंधीत निवडणुक निर्णय अधिका-याकडुन सदर साहित्य तपासून प्रमाणपत्र घेणे आवश्यक राहील. प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर इलेक्ट्रॉनिक मिडीयाव्दारे देखील प्रचारावर बंदी राहील. जर याचे उल्लघंन झाल्यास आचारसंहिता कक्षाने जिल्हा/तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांना अहवाल सादर करावा.

१४) **निवडणुक प्रचारासंदर्भात उमेदवाराने भित्तीपत्रके, पोस्टर्स, बॅनर्स लावण्याबाबत** :- याबाबत सध्या अस्तित्वात असलेल्या सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतिबंध कायदा, १९८४ व तसेच खाजगी वा सरकारी मालमत्ता विद्रुपन कायदा, १९९६ खाली असलेल्या तरतुदी लागू राहतील. अशा निवडणूक प्रक्रीया सुरु झालेल्या सहकारी संस्थेच्या कार्यक्षेत्रात व संस्थेच्या मालमत्तेव्यतीरिक्त इतर ठिकाणी उमेदवारास स्वत:च्या वाढदिवसाच्या शुभेच्छांचे बॅनर लावण्यास मुभा आहे. मात्र अशा बॅनरमध्ये संबंधित उमेदवाराच्या निवडणूक प्रचारासंबंधिचा मजकुर व निवडणूक होणाऱ्या संस्थेच्या संबंधिचा मजकुराचा आणि उमेदवाराच्या सहकार क्षेत्रातील कामाचा समावेश करता येणार नाही. जर याचे उल्लघंन झाल्यास आचारसंहिता कक्षाने जिल्हा/तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांना अहवाल सादर करावा.

१५) **आचारसंहितेच्या कालावधीमध्ये नेमणुका / भरती करण्याच्यादृष्टीने जाहिराती देणे, मुलाखती घेणे व प्रत्यक्ष नियुक्त्या करणेबाबत** :- आचारसंहितेच्या कालावधीमध्ये संबंधीत सहकारी संस्थेच्या सेवेत भरती करण्याच्या दृष्टीने जाहिराती देणे, मुलाखती घेणे इ.करण्यात येऊ नये. आचारसंहिता लागु होण्यापूर्वीच लेखी पत्रे पाठविले असल्यास लेखी परिक्षा घेण्यास हरकत नाही. तथापी, त्याचा निकाल जाहीर करता येणार नाही. तसेच मुलाखती व प्रत्यक्ष नेमणुका याबाबतची कार्यवाही आचारसंहिता कालावधीत करता येणार नाही. जर याचे उल्लघंन झाल्यास आचारसंहिता कक्षाने जिल्हा/तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांना अहवाल सादर करावा.

१६) **सहकारी संस्थेच्या अधिमंडळाच्या वार्षिक बैठका व संचालक मंडळाच्या बैठका** :- सहकारी संस्थेचे अधिमंडळाचे वार्षिक तसेच संचालक मंडळ व विविध समित्यांच्या (विषय समित्या इ.) बैठका ज्या कायद्यानुसार घेणे बंधनकारक आहे, त्या घेता येतील. परंतु त्यात नेमणुका, अनुदान, एखादी विशेष योजना जारी करुन त्या अंतर्गत कर्ज अथवा आर्थिक सहाय्य प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष स्वरुपात वैयक्तीक सभासदांना मंजूर किंवा अदा करण्यात येऊ नये. तसेच मतदारांवर कोणत्याही प्रकारे प्रभाव पडेल असे कोणतेही निर्णय घेता येणार नाही.

यावरील देखरेख आचारसहिंता कक्षाने करावी. जर याचे उल्लघंन झाल्यास आचारसंहिता कक्षाने जिल्हा/तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांना अहवाल सादर करावा.

या आचारसंहितेची अंमलबजावणी योग्यरितीने करण्यात येईल याबाबत सर्वांनी कसोशिने प्रयत्न करावेत. आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन होत आहे काय यावरील देखरेख अचारसंहिता कक्षाने करुन त्याचा अहवाल जिल्हा/तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांना सादर करावा.

आचारसंहितेच्या अंमलबजावणीबाबत या आदेशात नमुद केलेल्या मुद्दां व्यतिरिक्त काही शंका असल्यास जिल्हा / तालुका / प्रभाग सहकारी निवडणुक अधिकारी यांचे मार्फत स्वयंस्पष्ट अभिप्रायासह तपशिल मार्गदर्शनास्तव राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाकडे सादर करावा.

वरीलप्रमाणे परिपत्रकीय सुचनांचे पालन करण्यात यावे.

**मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, पुणे यांच्या मान्यतेनुसार.**

१०/०६/२०२०

(यशवंत गिरी)
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रति,**

१. जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी (सर्व)
२. तालुका / प्रभाग सहकारी निवडणुक अधिकारी (सर्व)

**प्रत माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव :-**

१. मा. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. मा. आयुक्त (साखर), साखर संचालनालय, पुणे.
३. मा.आयुक्त (दुग्धविकास), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४. मा.आयुक्त (वस्त्रोद्योग), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
५. मा.आयुक्त (मत्स), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६. मा.आयुक्त (पशुसंवर्धन) महाराष्ट्र राज्य, पुणे.